*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous)**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra.**

**VOLUME 11, ISSUE 6** **JUNE 2026**


# *MODLIB: E-Bulletin of Library & Information Centre*

# *Special Moments of June 2026*





**E-bulletin published by:**

**Prof. Dr. Nivedita G. Ekbote, Principal, MCASC (Autonomous), Shivajinagar, Pune-5.**

**Editor: Dr. Shantashree Sengupta, Librarian.**

**Editorial Assistant: Mrs. Sarika Sable, Clerk, Library.**



**E-mail: librarian@moderncollegepune.edu.in**

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: June 2026

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

# *Table of Contents*


| Sr. No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 1. | **Article by Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote, Chairman, P. E. Society** | |
| | • *अमेरिकेतील उच्च शिक्षणातील समस्यांसाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयेही जबाबदार: येलचा अहवाल* | 4 |
| | • *शिक्षणक्षेत्राचे नियमन सुलभ व्हावे* | 5 |
| 2. | **Events conducted by NSS in June 2026** | |
| | • *World Environment Day* | 7 |
| 3. | **International Yoga Day** | 8 - 11 |
| 4. | **Events conducted by the Library & Information Centre during June 2026** | |
| | • *Shiv Swarajya Din* | 12 - 15 |
| | • *Maharana Pratap Jayanti* | 16 - 17 |
| | • *Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Jayanti* | 18 - 20 |
| 5. | **Events conducted by departments during June 2026** | |
| | • *Department of Performing Arts* | 22 - 23 |
| 6. | **Newly added books and books received in Gratis during June 2026** | 24 |
| 7. | **E-newspaper Clippings** | 26 - 40 |
| 8. | **Condolence Message** | |
| | • *Late Dr. Manda Admane, Assistant Professor, Department of History* | 41 |
| 9. | **Upcoming Events: July 2026** | 42 |

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

तरुण भारत
Pune Main | 2026-06-11 | Page- 20
epaper.tarunbharat.net

## अमेरिकेतील उच्च शिक्षणातील समस्यांसाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयेही जबाबदार : येलचा अहवाल

प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे
कार्याध्यक्ष,
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे

येल अहवालात शैक्षणिक क्षेत्राने राजकीय व सांस्कृतिक शक्तींना वाढवण्यात घेतलेल्या भूमिकेचे कठोर चित्रण केले आहे. अमेरिकेतील उच्च शिक्षणाचे स्थान सध्या झपाट्याने बदलत आहे.

अमेरिकेतील महाविद्यालये आणि विद्यापीठे उच्च शिक्षणावरील अमेरिकन जनतेचा विश्वास कमी होण्यास मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहेत, असे येल विद्यापीठाच्या समितीने गेल्या बुधवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे.

उच्च शिक्षणाचा वाढता खर्च, अस्पष्ट व गुंतागुंतीची प्रवेश प्रक्रिया, असमान शैक्षणिक निकष आणि परिसरामध्ये (कॅम्पसमध्ये) अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबतच्या चिंता किंवा त्याचा अभाव, या सर्व कारणांमुळे उच्च शिक्षणाच्या उपयुक्ततेबद्दल अमेरिकेत असंतोष वाढत आहे, असे समितीने नमूद केले आहे.

या निष्कर्षांमुळे अनेक वर्षांच्या सर्वेक्षण व मुलाखतींमध्ये अमेरिकन लोकांनी व्यक्त केलेल्या शंकांचे आणि भीतीचे प्रतिबिंब दिसते. देशातील अत्यंत प्रतिष्ठित विद्यापीठांपैकी एका येलमधील १० प्राध्यापकांच्या समूहाने तयार केलेला हा अहवाल अमेरिकेतील शैक्षणिक क्षेत्राच्या योगदानावर कठोर टीका करतो.

विश्वास म्हणजे आपण जे सांगतो ते कृतीत आणून, आणि ते चांगल्या प्रकारे करून दाखविणे", असे समितीने लिहिले आहे. उच्च शिक्षणाच्या मूलभूत उद्दिष्टांबद्दल अमेरिकन विद्यापीठांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये "मोठ्या प्रमाणावर अनिश्चितता आणि अस्पष्टता" असल्याचे मत अहवालात व्यक्त केले आहे. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांवरील अमेरिकन जनतेचा विश्वास कमी होत आहे.

'सामाजिक समस्या सोडवण्यासाठी मदत करण्याबाबत विद्यापीठांवर दबाव येत आहे", असे नमूद करताना समितीने म्हटले की, 'निवडक परंतु सर्वसमावेशक, परवडणारी परंतु चैनीची/आलिशान, आणि गुणवत्ताप्रधान परंतु न्याय्य." अशी 'प्रत्येकासाठी सर्व' असण्याची मोठी आणि विचित्र अपेक्षा विद्यापीठांकडून केली जात होती.

मात्र, उद्दिष्टे आणि ध्येये स्पष्ट नसल्यास, महाविद्यालये व विद्यापीठे आपल्या मूलभूत बांधिलकीला कितपत न्याय देत आहेत, हे ठरवणे कठीण होते, असे मत प्राध्यापकांनी व्यक्त केले.

बहुतेक अमेरिकन शिक्षण संस्था येलसारख्या संस्थांपेक्षा खूप वेगळ्या आहेत, जिथे आर्थिक मदतीशिवाय पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा अंदाजित वार्षिक खर्च ९०,००० डॉलर्सपेक्षा (अमेरिकन चलनापेक्षा) जास्त असतो. अनेक संस्थांमधील प्रशासक- ज्यापैकी बहुतांश संस्थांचा खर्च खूपच कमी आहे आणि त्या अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देतात-आपल्या संस्था अशा काही निवडक विद्यापीठांशी अन्यायकारकपणे जोडल्या गेल्याची तक्रार करतात.

या सर्वसाधारण समजुतींमुळे सध्या विद्यापीठांमधील अभ्यासक्रम, विद्यापीठांना करदात्यांचा पाठिंबा आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उच्च शिक्षण व्यवस्थेवर केलेल्या टीकेसंबंधी अमेरिकेत जोरदार चर्चा सुरू आहे.

समितीने सांगितले आहे की सध्याच्या काही पद्धतींच्या एकत्रित परिणामामुळे शैक्षणिक क्षेत्राची प्रतिमा वेगाने घसरली आहे. गॅलप (ऋरश्रश्रीं) या संस्थेच्या मते, सप्टेंबर २०२५ मध्ये फक्त ३५% अमेरिकन लोकांनी महाविद्यालयीन शिक्षण "अत्यंत महत्त्वाचे" मानले. हे प्रमाण २०१३ च्या तुलनेत निम्मे आहे

ट्रम्प प्रशासनाने उच्चभ्रू विद्यापीठांवर टीका आणि त्यांना देण्यात येणाऱ्या निधीमध्ये कपात सुरू केल्यानंतर, येलने हा अहवाल तयार करण्याचे काम हाती घेतले. येलचे अध्यक्ष मॉरी मॅकॅनीस यांनी सांगितले की शैक्षणिक नेत्यांनी लोकांच्या भावना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची गरज आहे.

उदाहरणार्थ, येल आणि इतर अनेक संस्था प्रचंड फी आकारतात, पण नंतर मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना आर्थिक मदत (स्कॉलरशिप/सवलत) देतात. त्यामुळे अनेक विद्यार्थी प्रत्यक्षात कमी पैसे भरतात. तरीही या चुकीच्या धोरणामुळे त्यांच्यावरील जनतेचा विश्वास कमी झाला आहे, असे समितीने नमूद केले. ही प्रणाली गुंतागुंतीची, अनिश्चित, गुप्त आणि नेहमी बदलणारी आहे. त्यामुळे जनतेचा विद्यापीठांवर विश्वास वाढण्याऐवजी कमी होतो, असे अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे.

येलने जानेवारीमध्ये जाहीर केले की, ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न २,००,००० डॉलर्सपेक्षा कमी आहे, त्यांच्याकडून पदवीपूर्व शिक्षणासाठी शुल्क आकारले जाणार नाही. त्याचप्रमाणे ज्यांचे वार्षिक उत्पन्न १ लाख डॉलर्सपेक्षा कमी आहे, त्यांना कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

पदवीपूर्व प्रवेश प्रक्रिया, जरी त्या चांगल्या हेतूने सुरू केल्या असल्या तरी, ती अनेकदा अपारदर्शक आणि गुंतागुंतीची असते, असे समितीने पुढे म्हटले. शैक्षणिक कामगिरीसारख्या मूलभूत बाबींसाठीही त्यात सुस्पष्ट मानकांचा पूर्णपणे अभाव असतो. जेव्हा प्रवेश प्रक्रिया अनाकलनीयपणे अधिक वाईट आणि आधीच सधन असलेल्यांना फायदा होईल अशा प्रकारे पक्षपाती वाटते, तेव्हा अनेक अमेरिकन नागरिक या प्रप्रक्रियेवर विश्वास ठेवत नाहीत यात आश्चर्य वाटायला नको, असे समितीने आपल्या अहवालात लिहिले आहे.

एकंदरीत अमेरिकेमध्ये उच्च शिक्षणाची परिस्थिती पारदर्शक नाही. श्रीमंतांना अनुकूल अशी परिस्थिती अमेरिकेत महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये आहे. येल विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने तयार केलेल्या अहवामध्ये अमेरिकेतील महाविद्यालयात आणि विद्यापीठांच्या घसरत्या दर्जाबद्दल चिंता व्यक्त केली.

Powered by Bharati Web

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

प्रभात

## शिक्षणक्षेत्राचे नियमन सुलभ व्हावे

**शैक्षणिक**

प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे

**शिक्षणक्षेत्राचे नियमन सुलभ करून चांगले संस्थाचालक, प्राचार्य, उद्योजक यांसारख्या शिक्षणतज्ज्ञांना संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्यामुळे देशात शिक्षणाची उपलब्धता वाढेल.**



स्कॉट अँडरसन यांच्या King of Kings या उत्कृष्ट पुस्तकात १९७८ मध्ये इराणच्या शाहने अन्नटंचाईबाबत दिलेली प्रतिक्रिया नोंदवली आहे. त्याने अन्नटंचाई नाही, फक्त लोभी व्यापाऱ्यांचा साठेबाजीचा प्रकार आहे, असे म्हटले. त्यावर एका तज्ज्ञाने साठेबाजी ही टंचाईमुळेच होते असे सांगितल्यावर शाह संतापला आणि लोकांना 'तक्रारी करणे थांबवा आणि अधिक मेहनत करा', असा आदेश दिला. हा वास्तवापासून दूर गेलेला मूर्ख दृष्टिकोन त्याच्या सत्तेच्या समाप्तीचे कारण ठरला; अवघ्या १२ महिन्यांत तो सत्तेबाहेर गेला. अशीच परिस्थिती भारतातील शिक्षणाच्या प्रचंड मागणीला प्रतिसाद देणाऱ्या उद्योजकतेच्या मार्गात उभ्या असलेल्या कठोर नियमांमुळे निर्माण झाली आहे.

भारतामध्ये समृद्धी निर्माण करण्यात अडथळा ठरणारे प्रमुख कारण म्हणजे नियोक्ते (Employer) आणि तरुणांची कमी उत्पादकता. गेल्या दशकात उद्योगांच्या उत्पादकतेसाठी सुधारणा करण्यात आल्या, परंतु आता शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या विस्ताराला अडथळा आणणारे कालबाह्य नियम बदलण्याची तातडीची गरज आहे. १९४८ च्या राधाकृष्णन आयोगाने, १९६८ च्या कोठारी आयोगाने, २००७ च्या National Knowledge Commission ने समानता, उत्कृष्टता आणि उदारीकरण यांचा समतोल साधणारी शिक्षणव्यवस्था उभारण्याचा विचार मांडला होता.

वैद्यकीय शिक्षणातील क्षमता मर्यादित ठेवण्यासाठी भारतीय वैद्यकीय परिषदेत भ्रष्टाचार झाला, तर अभियांत्रिकी शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेत भ्रष्टाचार झाला. दरवर्षी देशात १६ लाख अभियांत्रिकी जागा उपलब्ध आहेत; पण एमबीबीएसच्या केवळ १.३ लाख जागा आहेत. अभियांत्रिकीमध्ये देणगी (कॅपिटेशन फी) जवळजवळ संपली, तर वैद्यकीय शिक्षणात ती वाढली. शिक्षणसंस्था एका दिवसात परिपूर्ण होत नाहीत. १९८० च्या दशकात आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडूमध्ये सुरू झालेली अनेक साधारण अभियांत्रिकी महाविद्यालये कालांतराने सुधारली आणि त्यांनी भारताच्या सॉफ्टवेअर उद्योगासाठी मनुष्यबळ तयार केले. आज सुमारे ३० टक्के अभियांत्रिकी जागा रिक्त राहतात. कमकुवत महाविद्यालये बंद होत आहेत, तर चांगली महाविद्यालये चांगल्या प्राध्यापकांचे वेतन वाढवत आहेत, त्यामुळे त्यांचा दर्जा उंचावत आहे.

सार्वजनिक विरुद्ध खासगी किंवा विदेशी विरुद्ध भारतीय संस्थांचा वाद अपरिपक्व आणि बेजबाबदार आहे. आपल्याला फक्त चांगल्या आणि वाईट शाळांची/महाविद्यालयांची काळजी असायला हवी. परंतु भारतातील शिक्षण नियम हे शिक्षणाच्या गुणवत्तेपेक्षा इमारती, कायदेशीर रचना इत्यादी तांत्रिक गोष्टींवर अधिक भर देतात. यामुळे शिक्षण उद्योजकांमध्ये चुकीची निवड (adverse selection) होते. यामध्ये गुणवत्तेचा विचार होत नाही.

मार्क ट्वेन यांचे प्रसिद्ध वाक्य आहे की 'शिक्षण म्हणजे बादली भरणे नव्हे, तर अग्नी प्रज्वलित करणे.' परंतु गरिबी दूर करण्यासाठी जगण्यासाठीचे शिक्षण जितके महत्त्वाचे आहे तितकेच वेतनासाठी शिक्षणही महत्त्वाचे आहे. याचा अर्थ शालेय शिक्षण पूर्णपणे व्यावसायिक बनवणे किंवा सिंगापूरप्रमाणे मुलांचे लवकर वर्गीकरण करणे असा नाही. सहा महिन्यांत प्लंबर, गवंडी, विक्रेता, रंगकाम करणारा किंवा ग्राहक सेवा कर्मचारी तयार करता येतो. आत्मविश्वास, जिज्ञासा, सर्जनशीलता आणि संवाद कौशल्ये विकसित होण्यासाठी अनेक वर्षे लागतात, हे मान्य करावे लागेल. सर्वांत महत्त्वाची कौशल्ये म्हणजे वाचन, संवाद लेखन, गणित आणि मानवी संबंध. दुर्दैवाने अनेक सरकारी शाळा या मूलभूत गोष्टी शिकवण्यात अपयशी ठरल्या आहेत. त्यामुळेच ५०% अधिक पालक या शाळांतील मोफत शिक्षण टाळतात.

उत्तम शैक्षणिक संस्थांसमोरील आव्हान म्हणजे शिक्षक आणि पायाभूत सुविधांसाठी जास्त खर्च आणि व्यापक समावेशासाठी कमी शुल्क यांमध्ये ताळमेळ साधणे. अपेक्षेप्रमाणेच, शुल्क आणि वाजवी नफ्याबद्दलच्या चर्चांमुळे संताप निर्माण होतो. पण खासगी शाळा २० वेगवेगळ्या शुल्क श्रेणी तयार करतात. त्याचप्रमाणे शुल्क नियमन करणाऱ्या संस्था अयशस्वी ठरल्या आहेत.

अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांची पिळवणूक होते. तेथे शासनाचे लक्ष नाही. काही ठिकाणी प्राचार्य, संस्थाचालक राजकीय दबावांमुळे मोकाट सुटतात. शिक्षण क्षेत्रात प्रचंड भ्रष्टाचार आहे. केंद्रिय संस्थांपासून जिल्हा परिषदेपर्यंत भ्रष्टाचार सर्वांनाच अनुभवायला येतो. शिक्षक नियुक्ती, शिक्षक मान्यता, शाळा/महाविद्यालय मान्यता इत्यादी गोष्टींमध्ये प्रचंड भ्रष्टाचार होतो. त्यासंबंधी कठोर उपाययोजना करावयास हवी.

अनुदान पद्धती आता कालबाह्य झाली आहे. त्यामध्ये बदल करावे. त्याचप्रमाणे शाळा/महाविद्यालये/विद्यापीठे यातील रिक्त पदे भरण्याची परवानगी ताबडतोब दिली पाहिजे. यासंबंधी नुसत्या घोषणा होतात.

एका बाजूला स्वायत्ततेचा उद्घोष करायचा आणि दुसऱ्या बाजूला शासनाने शाळा/महाविद्यालयांवर आर्थिकदृष्ट्या कडक नियंत्रण ठेवणे, ही सध्याची शोकांतिका आहे. सध्याचे शासनाचे धोरण खासगी विद्यापीठांना प्रोत्साहन देणारे व शासकीय विद्यापीठांना नामोहरम करणारे आहे. शासकीय विद्यापीठांमध्ये गोरगरीब, तळागाळातील विद्यार्थी शिकतात, याची गंभीर दखल राज्यकर्त्यांनी घ्यायला हवी.

उदाहरणार्थ, १) विद्यार्थ्यांचे शुल्काचे पैसे समाजकल्याण खात्याकडून फार उशिरा मिळणे. ७२% विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाकडून मिळेल, असा शासन निर्णय आहे. २) रिक्त अनुदानित पदे मंजूर करण्याबाबत प्रचंड वशिलेबाजी ३) घड्याळी तासांवर काम करणाऱ्या प्राध्यापकांची संख्या भरपूर प्रमाणात कमी करणे. उत्तम शिक्षक न मिळाल्यास गोरगरीब विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण मिळणार नाही, हे शासनाने लक्षात घ्यावे.

नियमन सुलभ करून शिक्षण क्षेत्रात अधिक उद्योजकता आणणे हा उपाय आहे. केंद्रीय शिक्षण मंडळाच्या मान्यतेसाठी राज्य सरकारच्या NOC ची अट काढून टाकणे. प्रवेश मूल्यांकन घेतल्यास शाळांना तुरुंगवासाची शिक्षा देणारे RTE मधील कलम रद्द करणे. फक्त कलम ८ कंपन्यांनाच नव्हे, तर सर्व कंपन्यांना शाळा आणि महाविद्यालये सुरू करण्याची परवानगी देणे. किमान जमिनीच्या अटी रद्द करणे, ज्यामुळे शिक्षण संस्था सुरू करण्यासाठी राजकारणी, जमीनमालक किंवा गैरप्रकार करणाऱ्यांनाच फायदा होतो.

सर्वोच्च न्यायालयानेही शिक्षणक्षेत्रातील घडणाऱ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शिक्षणक्षेत्रासंबंधीचे जुनाट कायदे रद्द करा, त्यांचे पुनरावलोकन करा, असा आदेश भारत सरकारला नुकताच एका विकासपत्रात दिला आहे, याची नोंद शासनाने घ्यावयाला हवी.

Pune Gramin Edition
Jun 24, 2026 Page No. 4
Powered by: erelego.com

# *Events Conducted by National Service Scheme (NSS) in June 2026*

# *World Environment Day 5.6.2026*

Tree plantation at Modern College of Arts, Science and Commerce Shivajinagar, Pune by the hands of Hon'ble Principal Dr. Nivedita G. Ekbote on the occasion of World Environmental Day.






# *International Yoga Day 21.6.2026*

## International Yoga Day 2026 Celebrations

Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 enthusiastically celebrated International Yoga Day 2026 with great zeal, energy, and participation.

Under the inspiring guidance of our respected Principal, Prof. Dr. Nivedita Ekbote, the event brought together teaching and non-teaching staff members, students, NSS volunteers, and NCC cadets in a collective commitment towards health, mindfulness, and holistic well-being.

The yoga session was expertly conducted by Dr. Sarika Thorat, whose guidance helped participants experience the true essence of yoga through a series of rejuvenating asanas, breathing exercises, and meditation techniques.

The programme was meticulously organized by Prof. Dr. Vikram Phale, Mr. Deepak Kute, and their dedicated team, whose efforts ensured the grand success of the celebration.

The event beautifully reflected the spirit of this year's Yoga Day, encouraging everyone to embrace yoga as a way of life and promote physical fitness, mental well-being, and inner harmony.

Heartiest congratulations and appreciation to all organizers, participants, NSS volunteers, NCC cadets, and staff members for making the celebration a memorable and inspiring success.













# *International Yoga Day 21.6.2026*


















# *International Yoga Day 21.6.2026*




















# *International Yoga Day 21.6.2026*

लोकमत

## मॉडर्न महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

### 'लोकमत'च्या सहयोगाने उपक्रम : योग ही सकारात्मक दिशा देणारी जीवनशैली

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे-५ व 'लोकमत' यांच्या संयुक्त विद्यमाने मॉडर्न पी. डी. एम. बी. ए. बॅडमिंटन कॉम्प्लेक्स येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी नगरसेवक अपूर्व खाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्राचार्या प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, खेळाडू, एनएसएस स्वयंसेवक आणि एनसीसी कॅडेट्स यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आरोग्य, सजगता आणि सर्वांगीण विकासासाठी एकत्रित बांधिलकी व्यक्त केली. यावेळी प्राचार्या प्रा. डॉ. एकबोटे यांनी सांगितले की, "योग ही भारताने संपूर्ण जगाला दिलेली एक अमूल्य देणगी आहे. योगाच्या माध्यमातून केवळ शारीरिक आरोग्यच नव्हे, तर मानसिक शांतता, आत्मविश्वास आणि सकारात्मक जीवनशैली विकसित करता येते. विद्यार्थी जीवनामध्ये अभ्यासासोबतच आरोग्य, शिस्त आणि संतुलित जीवनशैली यांना महत्त्व देणे अत्यंत आवश्यक आहे. नियमित योगाभ्यासामुळे एकाग्रता वाढते, तणाव कमी होतो आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते."

याप्रसंगी नगरसेवक अपूर्व खाडे यांनी सांगितले की, "योग ही केवळ व्यायामाची पद्धत नसून ती शरीर, मन आणि विचारांना सकारात्मक दिशा देणारी जीवनशैली आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक शांतता आणि संतुलन राखण्यासाठी योगाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे."

योग सत्राचे मार्गदर्शन डॉ. सारिका थोरात यांनी उत्कृष्ट पद्धतीने केले. या कार्यक्रमाचे नियोजन क्रीडा संचालक प्रा. डॉ. विक्रम फाले, दीपक कुटे, प्रा. अशोक कांबळे आणि सहकाऱ्यांनी केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

Hello Pune
Page No. 3 Jun 22, 2026
Powered by: erelego.com

# Events Conducted by Library during June 2026

## *1. Shiv Swarajya Din: 6th June 2026*

The Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 today on 06th June 2026 celebrated 'Shiv Swarajya Din' as per the Government of Maharashtra GR. Shiv Swarajya Din is the day of Coronation of Chhatrapati Shivaji Maharaj.

Under the guidance of Respected Principal Dr. Nivedita Ekbote Madam, the event started with Maharashtra Rajya Geet. Academics & Faculty of Science Vice Principal Dr. Sachin Sakate, Vice Principal Faculty of Arts Prof. Alka Kamble, Librarian Dr. Shantashree Sengupta, Registrar Shri. Ganesh Sathe paid their respect to Chhatrapati Shivaji Maharaj.

Principal Dr. Nivedita Ekbote Madam guided the audiences regarding the legacy of Shivaji Maharaj, his upbringing, work, contribution, achievement, management, leadership, war strategies, several battles and coronations etc.

Mrs. Sarika Sable, Clerk-Library did PowerPoint presentation of Forts won and built by Shivaji Maharaj.


Library Staff Shri. Amit Salunke did comparing of the event and presented the Vote of Thanks. The event got over with Rashtrageet gayan.

I am thankful to the staff members for attending the program.

**Regards,**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian.**



# Events Conducted by Library during June 2026


महाराष्ट्र शासन

## राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा॥धृ॥


भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा॥१॥


marathibhashan.com

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीव घेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा॥२॥

marathibhashan.com






# Events Conducted by Library during June 2026
















# Events Conducted by Library during June 2026














# Events Conducted by Library during June 2026

## *2. Maharana Pratapsingh Jayanti (तिथिनुसार): 17th June 2026*


On 17.6.2026, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Maharana Pratap Singh Jayanti' as per the Maharashtra Government GR.


Under the guidance of Respected Principal Dr. Nivedita Ekbote Madam, Vice Principal Prof. Dr. Sachin Sakate, Librarian Prof. Dr. Shantashree Sengupta, Vice Principal Prof. Dr. Rohidas Jagtap, Department of English HoD Dr. Sandeep Sanap, Department of Statistics Associate Professor Dr. Asmita Kamble, and Library Staff paid their respect to Maharana Pratap.

Maharana Pratap was one of the greatest Indian warriors. He was the ruler of Mewar, a province in Modern Day Rajasthan. Maharana Pratap was famous as a fearsome warrior and an excellent combat strategist. He protected the Mewar region against repeated onslaughts from the Mughals. Maharana Pratap was titled as "Mewari Rana" and was notable for his military resistance against the expansionism of the Mughal Empire and was known for his participation in the Battle of Haldighati and Battle of Dewair.

I am thankful to all who were present during the programme.

**Regards,**
**Dr. Shantashree Sengupta,**
**Librarian.**









# Events Conducted by Library during June 2026

### महाराणा प्रतापसिंह तथा प्रतापसिंह पहिले
### (१५४० - १९ जानेवारी १५९७)
### (अल्प परिचय)

महाराणा प्रताप हे सिसोदिया कुळातील क्षत्रिय राजपूत राजे होते. महाराणांचे पूर्वज मेवाडचे शासक होते.

**जन्म आणि बालपण**

विक्रम संवत ज्येष्ठ शुक्ल तृतीया शके १५४० रोजी महाराणा प्रतापसिंह यांचा जन्म पाली मारवाड येथे झाला.

**राज्याभिषेक**

इ.स. १५७२ मध्ये प्रतापसिंहाचा राजा (महाराणा) म्हणून राज्याभिषेक झाला. अतिशय पराक्रमाने आणि कुशलतेने त्यांनी राज्यकारभार चालवला. एक कुशल योद्धा, संघटक व राजकारणनिपुण असा राज्यकर्ता म्हणून त्यांनी आपला लौकीक निर्माण केला. महाराणा प्रतापसिंह यांचा चेतक नावाचा घोडा होता. चेतकवर स्वार होऊन हातात ८० किलोचा भाला घेऊन युध्द करीत असत.

**हळदीघाटीची लढाई**

हल्दीघाटी येथील प्रसिध्द लढाई महाराणा प्रतापसिंह आणि अकबर यांच्या सैन्यामध्ये सन १५७६ मध्ये झाली. मुघल सेनेचे नेतृत्व अकबराचा सेनापती मानसिंग करीत होता. महाराणा प्रतापसिंह यांच्याजवळ सुमारे ३००० घोडदळ आणि ४०० भिल्ल तिरंदाजांची फौज होती. तर मुघलांच्या सैन्यात सुमारे ८५,००० हजार पायदळ, घोडदळ, बंदुकी व तोफा होत्या. कमी सैन्य असूनही महाराणा प्रतापसिंहांच्या सैन्याने मुघल सेनेला सळो की पळो करुन सोडले. परंतु कमी सैन्य असल्यामुळे राजपूत सेनेला पराभव पत्करावा लागला. युध्दात जखमी झालेल्या महाराणा प्रतापसिंह यांचे प्राण त्यांच्या चेतक नावाच्या घोडयाने स्वत:च्या जीवाची पर्वा न करता वाचवले.

**मेवाडाचा विजय**

१५८२ मध्ये, महाराणा प्रतापसिंहांनी दिवेर येथे मुघल चौकीवर हल्ला चढवला आणि ती ताब्यात घेतली. यामुळे मेवाडमधील मोगल सैन्याच्या ताब्यात असलेल्या सर्व ३६ चौक्या त्यांच्या ताब्यात आल्या. या पराभवानंतर अकबराने मेवाड विरुध्दची सैन्य मोहीम थांबवली. दिवेरचा विजय हा महाराणा प्रतापसिंहांसाठी एक मुख्य अभिमानाचा विषय होता. इतिहासकार जेम्स टॉडने "मेवाडचे मॅरेथॉन" असे वर्णन केले आहे.


****


(स्त्रोत : सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)











# Events Conducted by Library during June 2026

## *3. Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Jayanti: 26th June 2026*

On 26th June 2026, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Rajarshi Shahu Maharaj Jayanti' as per the Maharashtra Government GR. Under the guidance of Respected Principal Dr. Nivedita Ekbote Madam, Vice Principal Prof. Shamkant Deshmukh Sir, Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff paid their respect to Rajarshi Shahu Maharaj.

Chhatrapati Shahu Maharaj of the Bhonsle dynasty of Marathas was a Raja and the first Maharaja of the Indian princely state of Kolhapur. Rajarshi Shahu was considered a true democrat and social reformer. Shahu Maharaj was an able ruler who was associated with many progressive policies during his rule. From his coronation till his demise, he worked for the cause of providing primary education to all regardless of caste and creed. He made great efforts to abolish the concept of caste segregation and untouchability. He introduced reservation system in government jobs for untouchable castes. He also worked towards betterment of the condition of women in his empire. He legalised widow remarriage in 1917 and made efforts towards stopping child marriage. Shahu Maharaj was a great patron of art and culture, encouraging music and the fine arts. He supported writers and researchers in their endeavours. He installed gymnasiums and wrestling pitches and highlighted the importance of health consciousness among the youth.
I am thankful to all who were present during the programme.

**Regards,**
**Dr.Shantashree Sengupta,**
**Librarian.**



**राजर्षी छत्रपती शाहू महाराज**
(दि.२६ जून, १८७४ - ६ मे, १९२२)
(अल्प परिचय)

महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानाचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण इ. सुधारणांचे पुरस्कर्ते. त्यांचा जन्म कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई ह्या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव. चौथ्या शिवाजी महाराजांच्या अकाली निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले (दि. १७ मार्च १८८४). राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले.

त्यांनी कोल्हापुरात ब्राह्मणेतर पुरोहितांची निर्मिती करण्यासाठी "श्री शिवाजी वैदिक स्कूल" ची स्थापना केली आणि मराठ्यांसाठी स्वतंत्र "क्षात्रजगद्‌गुरू" पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले (१९२०). धार्मिक व सामाजिक क्षेत्रांत हा एक अभिनव प्रयोग होता.

त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अंमलात आणला (१९१७). प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली.

खेड्यापाड्यांतील मुलांना उच्चशिक्षणाची सुविधा मिळावी, म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापुरात सर्व जाती जमातींसाठी वसतिगृहे स्थापन केली. शिवाय नाशिक, पुणे, नगर, नागपूर इ. अन्य ठिकाणी त्यांच्या प्रेरणेने व साहाय्याने अनेक वसतिगृहे सुरू झाली.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दि. २६ जुलै, १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५०% शासकीय नोकऱ्या मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अंमलात आणणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे हिंदुस्थानातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे त्यांनी आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या इ. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला.


आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली (१९१८). सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योग धंद्यांस प्रोत्साहन दिले.

छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने त्यांना "राजर्षी" पदवी बहाल केली (१९१९). त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)

# Events Conducted by Library during June 2026













# Events Conducted by Library during June 2026







# *Events Conducted by the Departments during June 2026*

# Department of Performing Arts

Eight deserving students persuing B.A. (Music) program at the Department of Performing Arts, Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune - 5, have been awarded scholarships by the Integral Arts Foundation.

The Department is deeply grateful to the Foundation for its generous support and commitment to encouraging young musicians. Our heartfelt thanks to Mr. Khushru Irani, a renowned architect and co-founder of the spot light forum for placing his trust in our department after closely following our work over the past three years.

We look forward to a long and meaningful association that will continue to support many more sincere and talented students in pursuing their journey in the performing arts.

We are thankful for the support and guidance of Dr. Shubhangi Puranik Madam (Vice Principal PG Section), Dr. Sachin Sakate Sir (Vice Principal Academics), Prof. Alka Kamble Madam (Vice Principal Arts) and our respected Principal Dr. Nivedita Ekbote Madam










# Department of Performing Arts











# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING JUNE 2026*

| Author | Title |
| --- | --- |
| RATNPARAKHI PRANAVKUMAR | STAGING MYTH : CRITIQUE OF PLAYS FROM DISCOURSE PERSPECTIVE \| DESIRE UNDER THE ELMS \| ANTIGONE \| ANDHA YUG |
| RATNAPARAKHI ULHAS | DEVA GHARACHE GNYAT KUNALA देवा घराचे ज्ञात कुणाला ! प्रा. वसंत कानेटकरांच्या 3 पौराणिक नाटकांचा रसस्वाद |
| RATNPARAKHI ULHAS | AAMHA GHARI DHAN : LEKH SANGRAH आम्हा घरी धन : लेख संग्रह |
| RATNPARAKHI ULHAS | PHULE VECHITA BAHARU |
| CHHABRIA PRALHAD P. | THERE'S NO SUCH THING AS A SELF-MADE MAN |

# News Paper Clippings : June 2026




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into




***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

प्रभात

# फार्मसी शिक्षणातील 'इन्स्पेक्टर राज' मोडीत

## दरवर्षी पीसीआयच्या मंजुरीची गरज नाही; उच्च न्यायालय



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२ -** देशातील औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) शिक्षण क्षेत्राला छळणाऱ्या इन्स्पेक्टर राजला नवी दिल्ली उच्च न्यायालयाने जोरदार चपराक दिली आहे. मान्यताप्राप्त फार्मसी कॉलेजेसना आता दरवर्षी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडून (पीसीआय) पुन्हा नव्याने मंजुरी घेण्याची कोणतीही कायदेशीर आवश्यकता नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे.

मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांच्या खंडपीठाने पीसीआयचे वादग्रस्त परिपत्रक फेटाळत, कॉलेजेसच्या बाजूने निकाल दिला आहे. पीसीआयने १४ डिसेंबर २०२३ रोजी एक परिपत्रक जारी करून, आधीच मान्यता असलेल्या कॉलेजेसनाही आगामी वर्षाच्या मंजुरीसाठी डिजी-फार्मेड पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करणे आणि शुल्क भरणे सक्तीचे केले होते. जे कॉलेजेस हे शुल्क भरणार नाहीत, त्यांना थेट प्रवेशास मनाई करण्याची धमकी देण्यात आली होती. या जाचक अटींविरोधात एसएलएस कॉलेज ऑफ फार्मसीसह अनेक संस्थांनी न्यायालयात धाव घेतली होती.

### » पीसीआयचा युक्तिवाद फेटाळला

न्यायालयात पीसीआयने फार्मसी अभ्यासक्रमाची दरवर्षी तपासणी व शुल्क वसुली करण्याचा कौन्सिलला अधिकार असल्याचा युक्तिवाद केला. मात्र, न्यायालयाने फार्मसी कायदा, १९४८ च्या कलम १२ अन्वये एकदा एखाद्या कोर्सला मान्यता मिळाली, की ती कायद्यानुसार रद्द केली जात नाही, तोपर्यंत कायम राहते. कायद्यात दरवर्षी मंजुरीच्या नूतनीकरण, शुल्क आकारण्याची कोणतीही तरतूद नसल्याचे नोंदवले.

### » शिक्षणाचा व्यापार थांबणार!

कौन्सिलकडून संस्थांची आर्थिक लूट करणारे कोट्यवधी रुपयांचे शैक्षणिक नियामक शुल्कही न्यायालयाने बेकायदेशीर ठरवून रद्द केले. या निर्णयामुळे दरवर्षी होणाऱ्या सरकारी तपासणीच्या जाचातून आणि संस्थांना भराव्या लागणाऱ्या लाखो रुपयांच्या अवैध शुल्काच्या सक्तीतून सुटका झाली आहे. कॉलेजेसच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ संजय शरावत यांनी प्रभावी बाजू मांडली.

“ फार्मसी संस्थांना दरवर्षी पीसीआयकडून नूतनीकरण किंवा मंजुरी घेण्याची कायदेशीर तरतूद नसल्याचा निकाल दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने देऊन एकदा मिळालेली मंजुरी कलम १३ अंतर्गत रद्द होईपर्यंत वैध राहील, असे स्पष्ट केले. त्यानुसार तंत्रशिक्षण संचालकांनी फार्मसी संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी राज्यातील डी.फार्म, बी.फार्म, फार्म.डी आणि एम.फार्म अभ्यासक्रमांना नूतनीकरणाची त्वरित मान्यता देऊन तशा सूचनाही राज्यातील विद्यापीठांनाही द्यायला हव्यात.

– **डॉ. गजानन एकबोटे,** कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

Pune City Edition
Jun 13, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

# युवकांच्या कल्पनाशक्तीतूनच उद्याचा भारत

**पुणे, ता. ३ :** ''देशाची ६५ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या युवा आहे. त्यामुळे आजचा युवक जसा विचार करेल, तसाच उद्याचा भारत घडणार आहे. समाजातील समस्यांवर केवळ चर्चा करण्यात वेळ घालवण्यापेक्षा युवकांनी त्यावर उपाय शोधण्याची वृत्ती विकसित करणे गरजेचे आहे,'' असे मत मॉडर्न महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांनी व्यक्त केले.

'यिन समर यूथ समिट २०२६'मध्ये 'यूथ लीडरशिप' या विषयावर त्यांनी संवाद साधला. ''महाविद्यालयीन काळातील विविध महोत्सव आणि उपक्रमांमुळे माझ्यात नेतृत्वगुण विकसित झाले. युवकांनी चुका करण्यास घाबरू नये. अनेकदा चुका आणि अनुभव यातूनच व्यक्तिमत्त्व अधिक सक्षम होते. सतत शिकत राहणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा अंगीकार करून सक्षमता निर्माण करावी.''



### डॉ. निवेदिता एकबोटे म्हणाल्या...

- युवकांमध्ये क्षमता आणि नेतृत्वकौशल्य विकसित करणे ही काळाची गरज.
- युवकांच्या कल्पनाशक्तीमध्ये मोठी क्षमता असते.
- समाज आणि परिसराशी नाते जोडण्यासाठी युवकांनी समाजात सक्रिय व्हावे.
- संधी शोधण्याची आणि सकारात्मक बदल घडविण्याची मानसिकता विकसित करावी.
- नवकल्पना, सामाजिक उत्तरदायित्व आणि कृतिशील नेतृत्व यांचा स्वीकार युवकांनी करावा.

Pune, Main
04/06/2026 Page No. 4

प्रभात

# कौशल्याधारित प्रशिक्षणामुळे युवकांना करिअरच्या संधी : डॉ. निवेदिता एकबोटे

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १६** - सध्याच्या काळात कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे सामान्यजनांच्या जीवनात आमूलाग्र बदल होत असून, युवा पिढीसाठी करिअरच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, असे मत मॉडर्न कॉलेजच्या प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे यांनी व्यक्त केले. यशस्वी ॲकॅडमी फॉर स्किल संस्थेच्या संतमाई स्किल डेव्हलपमेंट सेंटरमधील प्रशिक्षणार्थींच्या प्रमाणपत्र प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या.

डॉ. एकबोटे म्हणाल्या, की कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावामुळे केवळ तंत्रज्ञानाधारित रोजगार कदाचित संकटात आले असतील. मात्र, मानवी जीवनाशी थेट संबंधित असणाऱ्या कौशल्याधारित रोजगाराच्या संधी पूर्णपणे सुरक्षित आहेत. कौशल्यामुळे कुटुंबाचे उत्पन्न वाढून राहणीमानाचा स्तर उंचावण्यास मदत होते. आगामी काळात मॉडर्न कॉलेज आणि यशस्वी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने काही नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. या सोहळ्यात बेसिक फॅशन, टेलरिंग, मायक्रोसॉफ्ट ऑफिस, ब्युटी थेरपिस्ट आणि टॅली अशा विविध अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्रास्ताविक स्मिता धुमाळ यांनी केले, तर आभार श्रीकांत मिरजकर यांनी मानले. याप्रसंगी प्रशिक्षिका मीनाक्षी हिरेमठ व हिरा सानप यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

Pune City Edition
Jun 17, 2026 Page No. 13
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

नवराष्ट्र
Pune | 19 June 2026 | Page 2

# कौशल्य प्रशिक्षणातून स्वावलंबनाला बळ

**पुणे, शहर प्रतिनिधी.** कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे सामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक आणि आमूलाग्र बदल घडत असून युवक-युवतींसाठी करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत, असे मत पुणे महानगरपालिकेच्या गरवारे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांनी व्यक्त केले. यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्सच्या संतामाई स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या वतीने आयोजित कौशल्य विकास प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात डॉ. एकबोटे प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.यावेळी त्यांनी सांगितले की, कौशल्य प्रशिक्षणामुळे महिला आणि युवकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची संधी मिळते. प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगारासोबतच स्वयंरोजगाराचे विविध मार्ग खुले होतात. बदलत्या काळानुसार आवश्यक कौशल्ये आत्मसात केल्यास व्यक्ती स्वतःच्या प्रगतीबरोबरच समाजाच्या विकासातही योगदान देऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

epaper.navarashtra.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

### Appreciation Connects One With A Profound Artistic Tradition

# 'Curious about music? Listen intently till patterns emerge'

**Pushkar Lele**

Be it film songs, devotional, folk traditions, pop, jazz or classical, almost everyone enjoys music. Yet, as a Hindustani vocalist, I often hear people say, "I love classical music, but I don't really understand it. I'm just a Kansen."

The words are telling. While most people use the term casually, a few reflect upon its meaning. If Tansen symbolises the accomplished performer, Kansen represents the discerning listener. Becoming a Kansen is not a lesser achievement, it is a rewarding journey of musical discovery.


**WORLD MUSIC DAY**

Classical music is among the most sophisticated and codified art forms. It has its own grammar, vocabulary and aesthetics. One must gradually learn its codes and conventions to fully appreciate it. The more one understands its nuances, the richer the listening experience.

At a film appreciation course, I realised that despite years of watching cinema, I had missed much—visual composition, editing, symbolism and the idea and the concept of mise-en-scène, where every element within a frame serves a purpose.

The course opened an entirely new dimension of understanding. Music works in much the same way. New worlds reveal themselves when we recognise that there is always more to learn.

> The journey is simple. Ask questions, read, attend workshops, listen widely and, whenever possible, experience live performances. Learning music oneself can be equally transformative. Ultimately, becoming a Kansen means embracing music not to consume, but to experience



For most listeners, music begins as an emotional experience. Over time, curiosity often leads to deeper engagement.

Appreciation then becomes an active process of discovery. At the same time, responses to music remain deeply personal. A composition that profoundly moves one listener may leave another untouched. Emotional and even spiritual connections are as important as intellectual understanding.

Every meaningful engagement with music begins with awareness — becoming conscious of sounds, rhythms, instruments and the diversity of musical traditions around us. Exposure to different genres broadens our understanding of music as a cultural and artistic phenomenon.

From awareness comes acquaintance. This requires attentive and open-minded listening. Classical music, in particular, asks listeners to suspend assumptions and spend time with an unfamiliar soundscape. Whether through concerts, festivals, baithaks or digital platforms, the key is to listen with intent rather than treat music as background sound. Gradually, patterns emerge, structures become recognisable, recurring ideas get noticed and curiosity deepens.

This thirst for knowledge often leads to exploring the grammar and philosophy of the tradition — ragas, talas, improvisation and aesthetic principles. Classical music then transforms from a mysterious experience into a meaningful conversation.

Yet the goal is not merely technical knowledge. True appreciation emerges when understanding becomes instinctive. Knowing the structure of a raga is valuable; experiencing its emotional resonance is something altogether different. At that stage, listeners develop independent and informed responses, no longer relying on others to tell them what to admire.

Music appreciation matters because the quality of music is closely linked to the quality of its listeners. While much effort goes into increasing audience numbers, far less attention is given to cultivating informed listeners. If artists do not actively demystify classical music, future listeners may lose sensitivity to its subtleties, and nuance may give way to spectacle.

Music appreciation is not about simplifying classical music. It is about building bridges that allow more people to engage meaningfully with a profound artistic tradition.

From hearing to listening, from listening to understanding, and from understanding to appreciation enrich not only our relationship with music but also our capacity for curiosity, reflection and wonder. In an age of instant consumption, becoming a Kansen may be one of the most meaningful ways to rediscover the art of listening.

*(The writer is a Hindustani classical vocalist, scholar and researcher. He is the HoD of performing arts at Modern College of Arts, Science and Commerce, Pune)*

Times of India 21.6.2026

# *News Paper Clippings During June 2026*

## *Section: Education*

नवराष्ट्र
Pune | 04 June 2026 | Page 3

# देशातील ७२१ विद्यार्थी बनले 'एनईपी सारथी'

## उच्चशिक्षणातील सुधारणांसाठी नेतृत्वाची संधी

**पुणे, शहर प्रतिनिधी** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) - २०२० मधील विविध सुधारणा विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) राबविलेल्या 'एनईपी सारथी-स्टुडंट ॲम्बेसेडर फॉर अकॅडमिक रिफॉर्म्स इन ट्रान्सफॉर्मिंग हायर एज्युकेशन इन इंडिया' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची नियुक्ती केली आहे. देशातील २६२ उच्च शिक्षण संस्थांमधून निवडलेल्या ७२१ विद्यार्थ्यांना 'एनईपी सारथी' म्हणून नामांकन देण्यात आले आहे.

उच्च शिक्षण क्षेत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदी प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने यूजीसीने हा उपक्रम सुरू केला आहे. यासाठी विद्यापीठे, महाविद्यालये आणि इतर उच्च शिक्षण संस्थांकडून विद्यार्थ्यांच्या नामांकनांची मागणी करण्यात आली होती. विद्यार्थ्यांचा सहभाग हा केवळ वैयक्तिक विकासासाठीच नव्हे, तर भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेच्या भविष्यास आकार देण्यासाठीही महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

### गुणवत्तेच्या निकषावर निवड

उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व, प्रभावी संवाद कौशल्य, संघटन क्षमता, सर्जनशीलता, जबाबदारीची जाणीव आणि नेतृत्वगुण असलेल्या विद्यार्थ्यांची निवड 'एनईपी सारथी' म्हणून करण्यात आली आहे. हे विद्यार्थी त्यांच्या संस्थांमध्ये आणि विद्यार्थी समुदायामध्ये एनईपी-२०२० संदर्भातील विविध उपक्रम, जनजागृती कार्यक्रम आणि संवाद सत्रांचे आयोजन करणार आहेत. यूजीसीने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार एनईपी सारथींना धोरणातील विविध सुधारणा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नव्या शैक्षणिक संकल्पनांची माहिती देणे, विद्यार्थ्यांच्या सूचना आणि अभिप्राय संबंधित संस्थांपर्यंत पोहोचविणे तसेच शैक्षणिक सुधारणांबाबत जागरूकता निर्माण करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली आहे. यूजीसीच्या सचिव श्यामा रथ यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पाठविलेल्या पत्रात या उपक्रमात उत्साहाने आणि समर्पणाने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### यूजीसीचा 'एनईपी सारथी' उपक्रम सुरू

- देशातील २६२ उच्च शिक्षण संस्थांमधून ७२१ विद्यार्थ्यांची निवड
- एनईपी-२०२० च्या प्रसारासाठी विद्यार्थी दूत म्हणून काम
- जनजागृती, संवाद आणि शैक्षणिक सुधारणांमध्ये सक्रिय सहभाग
- नेतृत्व, संवादकौशल्य आणि संघटन क्षमतेच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण

NEP SAARTHI

epaper.navarashtra.com

# *News Paper Clippings During June 2026*

## *Section: Education*

पुढारी

# दहावी-बारावीच्या प्रश्नपत्रिका आता ऑनलाइन केंद्रावर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दहावी-बारावीच्या परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने पुढील वर्षापासून बोर्डाच्या प्रश्नपत्रिका ऑनलाइन पद्धतीने परीक्षा केंद्रांवर पाठविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला आहे. यासाठी आवश्यक संगणक, प्रिंटर, सॉफ्टवेअर, वायफाय आणि अन्य डिजिटल सुविधा राज्य मंडळाकडून उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

- राज्य शिक्षण मंडळ व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या संयुक्त बैठकीत निर्णय

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघ आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्यात सोमवारी राज्य मंडळाच्या मुख्य कार्यालयात झालेल्या संयुक्त सहविचार सभेत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी, सचिव डॉ. दीपक माळी, महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे उपस्थित होते. या नव्या व्यवस्थेनुसार परीक्षा सुरू होण्याच्या काही वेळ आधी प्रश्नपत्रिका ई-मेलद्वारे परीक्षा केंद्रांवर पाठविण्यात येतील. केंद्रांवर त्यांची मुद्रित प्रत काढून विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार वितरण केले जाईल.

### 'शिक्षण संक्रमण' मासिक पूर्णपणे डिजिटल

'शिक्षण संक्रमण' हे राज्य मंडळाचे मासिक पूर्णपणे डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे छपाई आणि टपाल खर्चात बचत होणार असून, अधिकाधिक शिक्षकांपर्यंत हे मासिक पोहचण्यास मदत होणार आहे.

### सीएसआरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शुल्क भरणार

राज्यातील उद्योग आणि कंपन्यांच्या सीएसआर निधीतून आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थी आणि मुलींचे परीक्षा शुल्क भरण्याचा उपक्रम राबविण्याची माहितीही डॉ. कुलकर्णी यांनी दिली. महासंघाने या निर्णयांचे स्वागत करीत राज्य मंडळाचे अभिनंदन केले.

My Pune Edition
Jun 04, 2026 Page No. 01
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During June 2026*

## *Section: Education*

सामना

# प्रश्नपत्रिका आता फक्त तीन-चार पानांची!


## परीक्षा केंद्रांमध्ये कपात करणार, दहावी-बारावीच्या परीक्षेत लक्षणीय बदल होणार

वर्धा, दि. ३ (प्रतिनिधी) - अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ व राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्यात मंगळवारी एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. त्यात दहावी व बारावीच्या परीक्षेत काही मोठे बदल करण्याचे ठरले आहे. डिजिटल आणि कमी पाने असलेली प्रश्नपत्रिका, परीक्षा केंद्रांमध्ये कपात असे काही बदल केले जाणार आहेत. राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. प्रामुख्याने या वर्षीपासून काही बदल लागू करण्यात येणार आहेत.

ऑनलाइन प्रश्नपत्रिका देण्यात येणार आहे. याची सुरुवात जुलैमध्ये होणाऱ्या परीक्षेपासून होणार आहे. या परीक्षेसाठी सर्वप्रथम प्रायोगिक तत्त्वावर पुणे जिल्ह्यातील २४ परीक्षा केंद्रांवर प्रचलित प्रश्नपत्रिका वितरणाची पद्धत बंद करून परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी ऑनलाइन प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्यात येईल व परीक्षा केंद्रांना सदर प्रश्नपत्रिकेच्या विद्यार्थी संख्या प्रमाणात झेरॉक्स प्रती काढाव्या लागतील. ही पूर्ण पद्धत राज्यामध्ये फेबुवारी/मार्च-२०२७च्या परीक्षेपासून अमलात येईल, असे राज्य मंडळातर्फे सांगण्यात आले. विशेष म्हणजे प्रश्नपत्रिकेच्या पानांची संख्यादेखील कमी केली जाईल, यासाठी लागणाऱ्या सर्व उपकरणांची व्यवस्था राज्य मंडळाच्या वतीने करण्यात येईल. तसेच परीक्षेचा कालावधीदेखील कमी केला जाईल. परीक्षेचा निकाल १५ एप्रिलपर्यंत घोषित केला जाईल.

*अतिवृष्टीबाधित १०वी व १२वीच्या विद्यार्थ्यांच्या फीमाफीबाबत शाळांनी कार्यवाही पूर्ण करून घ्यावी तसेच फेब्रुवारी/मार्च २०२७ च्या परीक्षेस बसणाऱ्या मुलींसाठी सीएसआर फंडाच्या माध्यमातून संपूर्ण फी माफ करण्याचे प्रयत्न चालू आहेत असे डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी सांगितले.*

*फेब्रुवारी/मार्च २०२७ च्या परीक्षेची गुणपत्रके तथा प्रमाणपत्रे १० दिवसांच्या आत दिली जातील. त्यावर विद्यार्थ्यांचा कलर फोटो असेल. बारावीच्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्रावर जन्म दिनांक असेल. यापुढे शाळांना शिक्षण संक्रमण शुल्क आकारले जाणार नाही.*



*राज्यामध्ये इयत्ता १०वी व १२वीची ८५००परीक्षा केंद्रे आहेत. त्यापैकी ज्या केंद्रांवर सर्व भौतिक सुविधा असतील अशी केवळ ६००० परीक्षा केंद्रेच सुरू राहतील.*

*फेब्रुवारी/मार्च २०२७ च्या परीक्षेपासून परीक्षकाचे काम तालुकास्तरावर ऑनलाइन ऑनस्क्रीन करून घेण्यात येईल व १५ एप्रिलपर्यंत निकाल लावला जाईल.*

*शाळांना कायम मंडळ मान्यता मिळण्यास येणाऱ्या अडचणींबाबत बैठकीत चर्चा झाली. राज्यातील कायम मंडळ मान्यता नसलेल्या शाळांची तालुका व जिल्हानिहाय माहिती संकलनासाठी विहित प्रपत्र करून देण्यात येईल व ही माहिती जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष यांनी राज्य मंडळाकडे १५ जूनपर्यंत पाठवावी, असे सांगण्यात आले.*

Pune Edition
Jun 04, 2026 Page No. 6
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During June 2026*

### *Section: Education*

पुण्य नगरी

# अकरावीच्या दुसऱ्या फेरीला उद्यापासून सुरुवात

## वेळापत्रक जाहीर

**। पुणे** : इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीला उद्यापासून (दि.६) सुरुवात होत आहे. या फेरीचे वेळापत्रक माध्यमिक शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आले. या फेरीची निवड यादी १३ जूनला जाहीर होणार आहे.

अकरावीच्या पहिल्या फेरीत ४ लाख ५१ हजार ५२ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. यामध्ये कॅप आणि कोटा पद्धतीने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यंदा अकरावीला १२ लाख ५१ हजार २५९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. ६ ते ९ जून या कालावधीत विद्यार्थ्यांना नवीन नोंदणी आणि अर्ज भाग १ मध्ये दुरुस्ती करता येईल. तसेच एक ते दहा महाविद्यालयांचा पसंतीक्रम नोंदवता येईल. या वेळी विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज लॉक करणे आवश्यक राहील. १३ जून रोजी महाविद्यालयांची वाटप यादी जाहीर होणार आहे. तसेच महाविद्यालयांचे कटऑफदेखील जाहीर होणार आहेत. याच दिवशी विद्यार्थ्यांना प्रवेशाची माहिती दिली जाणार आहे. १३ ते १६ जून या कालावधीत विद्यार्थ्यांना मिळालेल्या महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करायचा आहे. यादरम्यान, विद्यार्थ्यास प्रवेश रद्ददेखील करता येईल. १८ जून रोजी तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर होणार आहे. या फेरीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज अनलॉक करण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी भाग १ व २ लॉक करणे अनिवार्य आहे, अशी माहिती माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली.

Pune Edition

Jun 05, 2026 Page No. 12

Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During June 2026*

## *Section: Education*

पुण्य नगरी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी टास्क फोर्स गठीत

**मंत्री चंद्रकांत पाटील**

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अंमलबजावणीला अधिक गती देण्यासाठी आणि विद्यार्थिहितासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागमार्फत राज्यस्तरीय 'टास्क फोर्स' गठीत करण्यात आला आहे.

या निर्णयाविषयी माहिती देताना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील विद्यापीठे आणि



महाविद्यालयांमध्ये चारवर्षीय पदवी अभ्यासक्रम, ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट, मेजर-मायनर पद्धती, इंटर्नशिप, इंडियन नॉलेज सिस्टिम तसेच कौशल्याधारित शिक्षणाची अंमलबजावणी सुरू आहे. या प्रक्रियेदरम्यान विविध शैक्षणिक, प्रशासकीय व तांत्रिक बाबींमध्ये एकसमान मार्गदर्शनाची आवश्यकता लक्षात घेऊन विशेष टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे.

या टास्क फोर्सच्या अध्यक्षपदी माजी कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच विविध विद्यापीठांचे कुलगुरू, उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण संचालक आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्यांचा समावेश या समितीत करण्यात आला आहे. टास्क फोर्समार्फत चारवर्षीय पदवी अभ्यासक्रमातील चौथ्या वर्षाची रचना, इंटर्नशिप संदर्भातील कार्यपद्धती, क्रेडिट ट्रान्सफर, मल्टिपल इन्ट्री एक्झिट, मायग्रेशन, युनिफॉर्म ॲकॅडेमिक कॅलेंडर, आयकेएस अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांच्या अडचणींसाठी मदत कक्ष, तसेच शिक्षक प्रशिक्षण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर धोरणात्मक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याशिवाय, राज्यातील सर्व विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयांमधील एनईपी अंमलबजावणीचा नियमित आढावा घेऊन आवश्यक त्या शिफारशी शासनास सादर करण्यात येणार आहेत. ही समिती दर तीन महिन्यांनी प्रगती अहवाल सादर करणार आहे. राज्यातील उच्च शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, कौशल्याधारित, संशोधनाभिमुख आणि विद्यार्थिकेंद्रित करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

Pune Edition
Jun 07, 2026 Page No. 06
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During June 2026*

### *Section: Education*

सामना

# महाविद्यालयांत आता बायोमेट्रिक हजेरी

पिंपरी, दि. ८ (प्रतिनिधी) – शिक्षण विभागातर्फे कनिष्ठ महाविद्यालयांत बायोमेट्रिक हजेरी पद्धत सुरू करण्यात येणार आहे. यामुळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांची ७५ टक्के हजेरी सक्तीची होईल. कमी हजेरी असल्यास बारावीच्या परीक्षेला बसता येणार नाही.

कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांची बोगस हजेरी आणि इंटिग्रेटेड कोचिंग क्लासेसचे छुपे नेटवर्क रोखण्यासाठी शिक्षण विभागाने बायोमेट्रिक हजेरी सक्तीची केली आहे. महाविद्यालयांमध्ये ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे मुलांना शाळेमध्ये उपस्थित रहावे लागणार आहे. बायोमेट्रिक हजेरीमुळे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची अचूक माहिती उपलब्ध होणार असून बनावट उपस्थितीला प्रतिबंध होईल. तसेच, कनिष्ठ महाविद्यालयांमधील शैक्षणिक गुणवत्ता आणि शिस्त वाढविण्यास मदत होणार आहे.

## बायोमेट्रिक हजेरीचे फायदे

- बायोमेट्रिक हजेरीमुळे खोट्या उपस्थितीवर पूर्णपणे नियंत्रण राहणार.
- रजिस्ट्रर हजेरीतील फेरफार, गैरप्रकार थांबतील.
- डिजिटल डेटाबेस तयार होऊन अचूक रेकॉर्ड मिळेल.
- वर्गात नियमित उपस्थित राहिल्याने विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील शिकवण्यावर विश्वास वाढेल.
- प्रॅक्टिकल्सचा थेट फायदा होईल.

Pune Edition
Jun 09, 2026 Page No. 8
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During June 2026*

### *Section: Education*

लोकमत

मस्ट READ

# दुसऱ्या फेरीमध्ये ६.८० लाख विद्यार्थ्यांचे अकरावी प्रवेशासाठी अर्ज; शनिवारी कॉलेज जाहीर होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील इयत्ता अकरावी केंद्रीय आणि ऑनलाइन प्रवेशाची दुसऱ्या नियमित फेरीत एकूण ६ लाख ८० हजार ७८६ विद्यार्थ्यांनी त्यांचे पसंतीक्रम नोंदवून प्रवेश अर्ज लॉक केलेला आहे. गुणवत्ता आणि पसंतीक्रम यानुसार सदर विद्यार्थ्यांना शनिवारी (दि. १३) सकाळी कनिष्ठ महाविद्यालय वाटप केले जाणार आहे. विद्यार्थी/पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी केले आहे.

राज्यातील एकूण ९६४९ कनिष्ठ महाविद्यालयातील जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. यासाठी आत्तापर्यंत एकूण १३ लाख ६८ हजार ७७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. नियमित दुसऱ्या फेरीतील विद्यार्थी नोंदणीची सुरुवात शनिवारी (दि. ६) झाली होती. यामध्ये नवीन नोंदणी, प्रवेश अर्जाचा भाग-१ मधील दुरुस्ती आणि भाग-२ (कनिष्ठ महाविद्यालय पसंतीक्रम) दिलेल्या मुदतीत भरून प्रवेश अर्ज लॉक केला होता. यात सर्वाधिक मुंबई विभागात १,७३,२२३ विद्यार्थ्यांनी; तर सर्वात कमी लातूर विभागात ४०,७९२ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज लॉक केलेला आहे. पुणे विभाग दुसऱ्या स्थानी असून, येथे १,१८,६१५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले.




### विभागनिहाय स्टेट्स काय ?

| विभाग | पसंतीक्रम भरून अर्ज लॉक केलेली विद्यार्थी संख्या |
|---|---|
| अमरावती | ६५,१५३ |
| **छत्रपती संभाजीनगर** | **७६,३१८** |
| कोल्हापूर | ६६,४८० |
| **लातूर** | **४०,७९२** |
| मुंबई | १,७३,२२३ |
| **नागपूर** | **५६,७७३** |
| नाशिक | ८०,७३३ |
| **पुणे** | **१,१८,६१५** |
| इतर | २,६९९ |
| **एकूण** | **६,८०,७८६** |

Pune Main
Page No. 3 Jun 11, 2026
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During June 2026*

### *Section: Education*

# महाविद्यालयांसमोर चौथ्या वर्षाचे आव्हान

## सुविधांची जुळवाजुळव अन् प्राध्यापकांचा तुटवडा

■ **मीनाक्षी गुरव** : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. १५ : राज्यातील स्वायत्त महाविद्यालयांत पदवी अभ्यासक्रमाचे चौथे वर्ष २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होत आहे. मात्र, या निर्णयामुळे महाविद्यालयांची पुरती दमछाक होत असल्याचे वास्तव आहे. आवश्यक पायाभूत सुविधांची जुळवाजुळव, संशोधन निधी आणि प्रकल्पांसाठी शोधाशोध, विद्यार्थ्यांना वर्ग उपलब्ध करून देण्यासाठी वेळेची करावी लागणारी ओढाताण, पात्र प्राध्यापकांचा तुटवडा, यामुळे स्वायत्त महाविद्यालयांची पुरती कोंडी होत असल्याचे वास्तव आहे.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, स्वायत्त महाविद्यालयांमध्ये नवे बदल शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यात आले. त्यानुसार स्वायत्त महाविद्यालयांत चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील शेवटचा टप्पा (म्हणजेच चौथे वर्ष) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून सुरू होत आहे. हा टप्पा सुरू होण्याची वेळ अगदी दारात येऊन ठेपली आहे. या वर्षात विद्यार्थ्यांना 'बॅचलर डिग्री ऑनर्स' किंवा 'बॅचलर डिग्री ऑनर्स विथ रिसर्च' असे दोन पर्याय असणार आहेत. दरम्यान, महाविद्यालयांना चौथ्या वर्षासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे जाणवले.

सध्या बहुतांश महाविद्यालयांत सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रांत वरिष्ठ पान ६ वर >>

> स्वायत्त महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमांचे चौथे वर्ष सुरू होत आहे. चौथ्या वर्षात संशोधन प्रकल्पांसाठी 'बीएमसीसी'कडे स्वत:चा निधी आहे. त्याचबरोबर आम्ही विविध संस्था, कंपन्यांबरोबर संशोधन निधी, प्रकल्प यासाठी सामंजस्य करार करण्याचा प्रयत्न करत आहोत.
> **- डॉ. दीपक पौडेल,** प्राचार्य,
> बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (बीएमसीसी)

> कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालये एकाच कॅम्पसमध्ये आणि त्याबरोबरच पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू असणाऱ्या महाविद्यालयांना चौथ्या वर्षाचे वर्ग भरविण्यासाठी वेळेची जुळवाजुळव करण्यासाठी ओढाताण करावी लागणार आहे. चौथे वर्ष 'ऑनर्स' किंवा 'ऑनर्स विथ रिसर्च'मध्ये करण्यासाठी महाविद्यालयांमार्फत विविध संबंधित संस्था, उद्योग क्षेत्र यांच्याशी सामंजस्य करार करण्याचा प्रयत्न होत आहे. आवश्यक पात्र प्राध्यापकांची कमतरता जाणवणार असल्याची वस्तुस्थिती आहे.
> **- डॉ. मनोजकुमार देवणे,** प्राचार्य,
> सिंबायोसिस कला आणि वाणिज्य महाविद्यालय

### पात्र प्राध्यापकांचा तुटवडा

■ **पदवीच्या चौथ्या वर्षात विद्यार्थ्यांना 'ऑनर्स' किंवा 'ऑनर्स विथ रिसर्च' (संशोधनासह) असे दोन पर्याय आहेत. मात्र, 'ऑनर्स विथ रिसर्च' हा पर्याय केवळ नावापुरता उरणार की काय, अशी भीती आहे. संशोधनासाठी महाविद्यालयांकडे मान्यताप्राप्त संशोधन केंद्र आणि विशिष्ट पात्रताधारक प्राध्यापक असणे बंधनकारक आहे. परंतु अशा पात्र प्राध्यापकांचा अभाव आहे. सध्या कार्यरत असलेले अनेक ज्येष्ठ आणि पात्र प्राध्यापक निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत.**

# महाविद्यालयांसमोर चौथ्या वर्षाचे आव्हान

>> पान १ वरून

आणि कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग भरतात. त्यातच पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे वर्गही सुरू असतात. अशा स्थितीत चौथ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना बसायला जागा कुठून आणायची? हा यक्ष प्रश्न प्राचार्यांसमोर आहे. वर्गखोल्यांचे व्यवस्थापन करताना वेळेची प्रचंड ओढाताण होणार असल्याचे प्राचार्यांचे म्हणणे आहे.

पदवीचे चौथे वर्ष सुरू करण्यासाठी धोरणात उद्योग क्षेत्राशी आणि नामांकित संशोधन संस्थांशी सामंजस्य करार आवश्यक असणार आहे. मोठ्या शहरांतील शिक्षण संस्थांना उद्योगांचे दरवाजे सहज खुले होतील. मात्र ग्रामीण आणि निमशहरी भागातील स्वायत्त महाविद्यालयांचे काय? ग्रामीण भागातील भौगोलिक आणि आर्थिक मर्यादांमुळे त्यांना मोठ्या कंपन्यांशी टाय-अप करताना नाकीनऊ येत आहे.

Sakal 16.6.2026

## *News Paper Clippings During June 2026*

### *Section: Education*

लोकमत

# अकरावीच्या दुसऱ्या फेरीत १.९० लाखांहून अधिक प्रवेश

### केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, मंगळवारी (दि. १६) रोजी रात्री ९.१० वाजेपर्यंत राज्यातील विविध विभागांमध्ये एकूण २ लाख ८६ हजार २९ विद्यार्थ्यांपैकी १ लाख ९० हजार ७६६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत ,अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.

प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कॅप कोट्यातील १ लाख ५९ हजार ७५१, इनहाऊस कोट्यातील १० हजार ३९५, अल्पसंख्याक कोट्यातील १४ हजार ३८६ आणि व्यवस्थापन कोट्यातील ६ हजार २३४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दुसऱ्या फेरीत सर्वाधिक विद्यार्थ्यांना जागा वाटप मुंबई विभागात झाले असून येथे ८१ हजार ११४ विद्यार्थ्यांना प्रवेश वाटप करण्यात आले. त्यापैकी ४० हजार १५३ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे.

पुणे विभागात ४८ हजार ६२१ विद्यार्थ्यांना जागा वाटप झाले असून ३२ हजार १०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात ३५ हजार २९१ विद्यार्थ्यांना वाटप झाले असून त्यापैकी २६ हजार ६१५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. नाशिक विभागात २० हजार ९८७, अमरावती विभागात २० हजार ८९२, नागपूर विभागात २० हजार ४१७, कोल्हापूर विभागात १६ हजार १७६ आणि लातूर विभागात १३ हजार ४२२ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे.

**दुसऱ्या फेरीत सर्वाधिक विद्यार्थ्यांना जागा वाटप मुंबई विभागात झाले.**

विभागनिहाय पाहता, मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख विभागांमध्ये सर्वाधिक प्रवेश निश्चित झाले आहेत. राज्यभरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांमधील जागांसाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी स्पर्धा दिसून येत आहे. दुसऱ्या फेरीतील प्रवेश निश्चितीमुळे अनेक विद्यार्थ्यांचे इच्छित महाविद्यालयातील प्रवेशाचे स्वप्न पूर्ण झाले आहे. दरम्यान, प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून अंतिम प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. उर्वरित रिक्त जागांसाठी पुढील प्रवेश फेऱ्यांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले असून, आगामी फेऱ्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर प्रवेश होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

Hello Pune
Page No. 2 Jun 18, 2026
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During June 2026*

### *Section: Education*

# FYJC students can now switch streams & colleges after admns

## New Online System Provides Flexibility, Helps Make Better Decisions

SwatiShindeGole@timesofindia.com

**Pune:** Students enrolled in first-year junior college (FYJC, Std XI) across Maharashtra will now have greater flexibility in modifying their academic choices after admission. The directorate of secondary and higher secondary education has introduced a new online system allowing students to change their stream, subjects, medium of instruction and even their junior college.

Director of education Mahesh Palkar said, "Many students realise after admission that their interests or career plans differ from the stream they initially selected. This system provides them with an opportunity to make necessary changes through a transparent online process."

Education officials, however, clarified that science-stream students might move to commerce or arts, but students from commerce or arts could not switch to science after admission. Explaining the rationale behind the move, they said science required laboratory practicals, technical coursework and foundational concepts taught from the start of FYJC and needed for Std XII. "Restrictions on moving into the science stream have been retained due to its structured academic requirements," Palkar said.

### SCIENCE SHIFT RULED OUT FOR ARTS

- Online system introduced to allow post-admission changes for FYJC (Std XI) students and for students moving from FYJC to Std XII
- The allowed changes include stream, subjects, medium of instruction and junior college (transfer)
- Science students may shift to commerce/arts, but commerce/arts students cannot shift to science after admission
- CBSE/ICSE/other non-Maharashtra board students can apply for admission into Maharashtra state board system
- Junior colleges instructed to immediately implement the system

The online facility will be accessible from 10am on the department's official portal.

Under the new system, both students progressing from FYJC to Std XII and those seeking fresh FYJC admissions can apply online to change their stream, subjects or medium of instruction. Students from CBSE, ICSE and other boards outside Maharashtra will also be eligible to apply for admission into the Maharashtra state board system.

The officials said students seeking any change would need to submit valid reasons as part of the process. The department will also release detailed guidelines to ensure smooth implementation for both students and institutions. "The initiative also aims to support families affected by job transfers. Students whose parents have been transferred under govt orders will be allowed to change their junior colleges by submitting the necessary documents. In exceptional situations, such as serious personal or family circumstances, students may apply for a college transfer through their current institution, with applications reviewed by the deputy director of education concerned," Palkar said.

Students dubbed the move much-needed. Ketaki Ranade, an FYJC student from Pune, said, "Many students choose streams under pressure or without enough information. This facility will help them make better decisions before it's too late."

Another student, Aditya Patil, said, "The online process will save time and reduce confusion. It's a very positive step as students should have the opportunity to align their studies with their interests and career goals."

The directorate of education has told all junior colleges to implement the new system promptly. The officials said the initiative was designed to make the admission process more student-friendly, while maintaining academic standards and eligibility criteria.

The Times of India 23.6.2026

## *News Paper Clippings During June 2026*

### *Section: Education*

पुढारी

# भारतात खुले होणार परदेशी विद्यापीठीय शिक्षणाचे दालन

## आघाडीच्या १५ विद्यापीठांचे कॅम्पस; परदेशातील पदवी आता कमी खर्चात मिळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात एक ऐतिहासिक बदल घडत आहे. आता भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण घेण्यासाठी परदेशात जाण्याची गरज भासणार नाही, कारण आघाडीच्या १५ परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस थेट भारतात सुरू होत आहेत. चालू शैक्षणिक वर्षात ऑगस्ट महिन्यापासून या कॅम्पसमध्ये शैक्षणिक सत्रांची सुरुवात होण्याची दाट शक्यता आहे. या कॅम्पसमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित परदेशी विद्यापीठाचीच मुख्य पदवी दिली जाईल. या पदवीची मान्यता ही परदेशात जाऊन घेतलेल्या पदवीसारखीच असेल.




राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० अंतर्गत भारतातील उच्च शिक्षणाचे वाढते आंतरराष्ट्रीयीकरण यावर शिक्षण मंत्रालयाने विशेष भर दिला आहे. 'यूजीसी नियम २०२३' नुसार, भारतात परदेशी उच्च शैक्षणिक संस्थांचे कॅम्पस स्थापन करणे आणि चालवण्यामुळे भारताची जागतिक शैक्षणिक क्षेत्रातील ओळख अधिक ठळक झाली आहे. तसेच यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता आणि निकोप स्पर्धेला चालना मिळाली आहे, असा दावा केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने केला आहे.

या नियमावलींतर्गत १५ परदेशी विद्यापीठांना 'लेटर ऑफ इंटेंट' देण्यात आले आहेत. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात न जाताच जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त नामांकित संस्थांचे शिक्षण अगदी जवळ उपलब्ध करून देणे आणि उच्च शिक्षणाच्या नवीन संधी निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

### शिक्षणाचा खर्च होणार कमी

परदेशात जाऊन शिकताना येणारा प्रचंड प्रवास खर्च, राहण्याचा खर्च आणि तेथील महागडी फी यापासून भारतीय विद्यार्थ्यांची सुटका होणार आहे. भारतात कॅम्पस सुरू झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण अगदी कमी खर्चात उपलब्ध होईल. यातील अनेक विद्यापीठांनी येत्या ऑगस्ट महिन्यापासून त्यांचे पहिले शैक्षणिक सत्र सुरू करण्याचे नियोजन केले आहे.

### याचा विद्यार्थ्यांना काय फायदा होईल?

- परदेशातील राहणीमानाचा खर्च वाचल्यामुळे मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांनाही आता जागतिक दर्जाचे शिक्षण घेणे शक्य.
- परदेशी विद्यापीठांचे प्राध्यापक आणि अभ्यासक्रमासंबंधीचे जे नियम त्यांच्या मूळ देशात असतात, तीच गुणवत्ता भारतातही राखली जाणार.
- भारतातच जागतिक दर्जाची पदवी मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीच्या मोठ्या संधी.

Pune Edition
Jun 29, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

# *Condolence Message*



कळवण्यात अत्यंत दुःख होते की, मॉडर्न महाविद्यालयातील निवृत्त प्रा.डॉ. मंदा अदमाने (इतिहास विभाग) यांचे हृदय विकाराच्या आजाराने दि.३-६-२०२६ रोजी निधन झाले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना....!

याकठीण प्रसंगात आपण सर्वजण अदमाने कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत.


श्रीराम जय राम जय जय राम...!


श्रीराम जय राम जय जय राम....!

श्रीराम जय राम जय जय राम.....!

# *Upcoming Events*

## July 2026

| MON | TUE | WED | THU | FRI | SAT | SUN |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 ***Vasantrao Naik Jayanti***  | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 ***Lokmanya Bal Gangadhar Tilak Jayanti***  | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.com*